# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 1750 /2022-23 दि.19 /10 /2023

प्रति,
सिस्टिम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिळकत विभागांतर्गत विविध कामकाज करणेकरीता तांत्रिक व महसुल विभागातील अनुभवी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवा ठोक मानधन तत्वावर घेणेबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त महोदय यांचे दि.17/10/2023 रोजीची मान्यता.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिळकत विभागांतर्गत विविध कामकाज करणेकरीता तांत्रिक व महसुल विभागातील अनुभवी सेवानिवृत्त मंडळ अधिकारी, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व सेवानिवृत्त सर्व्हेअर यांची सेवा ठोक मानधन तत्वावर घेणेबाबत संदर्भियान्वये मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग व मिळकत विभागाकरीता सेवानिवृत्त मंडळ अधिकारी, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व सेवानिवृत्त सर्व्हेअर या पदावर सेवाकरार पध्दतीने उपलब्ध करुन घेणेबाबतची जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. (सोबत जाहिर सूचनेची छायांकित प्रत)

(सुनिल यादव)
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.**
**दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/ 1750 /2023-24** **दि.19 / 10 /2023**

**ठोक मानधन तत्वावर सेवानिवृत्त मंडळ अधिकारी, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व सेवानिवृत्त सर्व्हेअर उपलब्ध करुन घेणेबाबत.**

**।।जाहीर सूचना।।**

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका महाराष्ट्र महागनरपालिका अधिनियम 53(3) नुसार मिळकत विभागासाठी आरक्षित जागांचे भूसंपादन प्रक्रिया, मनपाच्या विविध मालमत्तांचे Valuation करणे, मनपाच्या विविध प्रकरणांचे TDR व देखभाल दुरुस्तीची कामे करणेकरीता शासकीय/निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त झालेले महसुल विभागातील मंडळ अधिकारी व तांत्रिक विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व सर्व्हेअर या पदासाठी अनुभवी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना 06 महिन्याकरीता ठोक मानधन तत्वावर घेणेबाबत सेवाकरार पध्दतीने भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेद्वारांकडून अर्ज मागवित आहेत.

इच्छुक व पात्र उमेद्वारांनी दि.31/10/2023 रोजी सायं.4:00 वाजेपर्यत आवक-जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे टपालाव्दारे व स्वहस्ते अर्ज करावयाचे आहेत. पोस्टाच्या विलंबामुळे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही. अथवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जांचे लखोटे उघडण्यात येणार नसून अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर "मंडळ अधिकारी (सेवानिवृत्त), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) व सर्व्हेअर (सेवानिवृत्त) पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

खालील अ.क्र.1 ते 3 मधील पदांसाठी अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची दि.01/11/2023 रोजी मुलाखत घेण्यात येईल. परंतू अ.क्र.1 ते 3 पदासाठी उमदेवार उपलब्ध न झाल्यास दि.07/11/2023 रोजी पर्यंत उमदेवारांचे अर्ज घेण्यात येऊन दि.08/11/2023 रोजी मुलाखत घेण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नांव व ठोक मानधन | पद संख्या | विवक्षित कामे | अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1. | मंडळ अधिकारी (सेवानिवृत्त) (मासिक ठोक मानधन रु.40,000/-) | 01 | 1. महानगरपालिकेच्या आरक्षित जागांचे भूसंपादन प्रक्रिया राबविणे. | शासकीय सेवेमध्ये महसुल विभागात मंडळ अधिकारी या पदावर किमान 05 वर्षे कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| 2. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) (मासिक ठोक मानधन रु.40,000/-) | 01 | 1.महानगरपालिकेच्या विविध मालमत्तांचे Valuation करणे.<br>2.महानगरपालिकेच्या विविध प्रकरणांचे TDR व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | अ) शासकीय/निमशासकीय सेवेमध्ये कनिष्ठ अभियंता पदावर किमान 10 वर्षे कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>ब) भूसंपादन विभागात कामकाज केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | सर्व्हेअर (सेवानिवृत्त) (मासिक ठोक मानधन रु.30,000/-) | 02 | महानगरपालिकेच्या आरक्षित जागांचे भूसंपादन प्रक्रिया राबविणे. | अ) शासकीय/निमशासकीय सेवेमध्ये सर्व्हेअर या पदावर किमान 10 वर्षे कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>ब) भूसंपादन विभागात कामकाज केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

**<u>अटी व शर्ती</u>** :-

1) उमेदवार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन मंडळ अधिकारी, कनिष्ठ अभियंता व सर्व्हेअर-01 या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे.
2) करारपध्दतीने नेमणूकीकरीता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.
3) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती 06 महिन्याकरीता देण्यात येईल. तद्नंतर नियुक्ती संपुष्टात येईल.
4) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.
5) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुदध विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
6) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
7) उमेदवाराने अर्जामध्ये सेवानिवृत्त आदेशाची छायांकित प्रत व कामकाजाचे अनुभव, राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावे.
8) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
9) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.
10) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
11) **<u>निवड प्रक्रिया</u>** :-

**अ.क्र.1 ते 3 मधील प्रत्येक पदासाठी मुलाखत 50 गुणांची असुन, गुणानुक्रमे उमदेवारांची निवड करण्यात येईल.**

- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका